**<u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक २ चा सरतपास विधिज्ञ श्री. एम. बी. गुंजाळ यांचेकडून सुरु</u> -**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | :- | आण्णासाहेब किसन चिंधे |
| वय | :- | ५१ वर्षे |
| नेमणुक | :- | शिरस्तेदार, उपअधिक्षक,<br>भुमी अभिलेख कार्यालय, श्रीरामपुर |
| राहणार | :- | गळनिंब, , ता. श्रीरामपूर, जि.अहमदनगर |

वादीने आमच्या कार्यालयात सिटी सर्वे नं. ८८ च्या मोजणीसाठी अर्ज दाखल केला होता. त्यासाठी वादीने मोजणी फी/चलण भरली होती. आमच्या कार्यालयाने सिटी सर्वे नं. ८८ च्या मोजणीकामी माझ्या नावाचा कार्यालयीन लेखी आदेश काढला होता. त्यानंतर मी अर्जदार (वादी) व जाबदार लगत कब्जेदार रामनाथ बाबुराव घारे (मयत) यांचे वारस लक्ष्मण रामनाथ घारे व राजु रामनाथ घारे यांना मोजणीच्या नोटीसा काढल्या. तसेच मी दौलत भाउराव गडाख, गंगा गजु गडाख (मयत) चे वारस कोंडाजी गंगा गडाख यांना मोजणी नोटीसा काढल्या.

**०२.** दि. १८/१०/२०१३ रोजी मोजणीकामी सिटी सर्वे नं. ८८ मौजे पारेगांव बु., ता. संगमनेर, येथे गेलो. मी माझेसोबत सिटी सर्वे नं. ८८ चा कार्यालयीन अभिलेख नेला होता. अर्जदार व जाबदार यांनी दाखविलेल्या सिटी सर्वे नं. ८८ मधील त्यांच्या वहिवाटींना चुन्याच्या खुना करुन फलक यंत्राच्या सहाय्याने मोजणी केली व अभिलेखाच्या सहाय्याने हद्दीच्या खुना पंचांसमक्ष दाखविल्या. तसेच अर्जदार व लगत कब्जेदार सोमनाथ महिपत घारे यांचे जबाब नोंदविले. पंचनामा तयार केला. त्यानंतर मी मोजणी नकाशा तयार केला.

**०३.** आज मला कोर्टातील साक्षीसमन्स मिळाले आहे. साक्षीसमन्समध्ये लिहलेप्रमाणे मी सर्व कागदपत्रे माझेसोबत आणलेली आहेत.

मोजणी नकाशाची अ व ब प्रत मी सोबत आणली आहे. मोजणी नकाशाची क प्रत अर्जदार यांना दिली. सदरचा अभिलेख अ हा मी क्षेत्राप्रमाणे तयार केला. सदर अ शिटमध्ये निळया रंगाने दाखविलेली मिळकत ही सर्वे नं. ८८ पैकी असुन ती लगत कब्जेदार सोमनाथ महिपत घारे यांच्या वहिवाटीस असुन तिचे क्षेत्र २० चौ. मी. इतके आहे. मोजणी करते वेळेस अर्जदार व लगत कब्जेदार सोमनाथ महिपत घारे हजर होते. मोजणीच्या नकाशामधील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरची मोजणी मी दावा मिळकतीमध्ये जावून केलेली आहे.

**०४.** **( आता साक्षीदाराला मोजणी नकाशाची क प्रत दाखविली.)** सदरचा मोजणी नकाशाची क प्रत ही मोजणी नकाशाच्या अ प्रतीवरुन तयार केला असून तो तंतोतंत जूळत आहे. मोजणी नकाशाच्या क प्रतिवर मोजणी करणार म्हणून माझी सही आहे, तसेच त्यावर शिरस्तेदार व परिरक्षण भुमापक (शहर) यांच्या सहया व उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, संगमनेर यांचा शिक्का आहे. मोजणी नकाशाच्या क प्रतिमधील मजकूर खरा व बरोबर आहे. **( मोजणी नकाशाच्या क प्रतीस निशाणी ४५ देण्यात येते.)**

**( वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा सरतपास वादीचे विधीज्ञ यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

श्रवणोत्तर स्वीकृत.

संगमनेर
दिनांक :- ०५/०८/२०२४

**( के.के.पाटील )**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश,
संगमनेर

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा सरतपास वादीचे विधीज्ञ ॲड. एम. बी. गुंजाळ यांचे तर्फे पुढे सुरु</u>** -

**०५.** मी मौजे पारेगाव बु., ता. संगमनेर येथील सिटी सर्वे क्र. ८८ ची मो.र.नं. ७३/२०१३ अन्वये मोजणी केली असुन त्याची सर्व प्रमाणीत कागदपत्रे

न्यायालयाच्या अभिलेखावर दाखल केली आहेत. मी निशाणी ४७/१ येथे वादीने आमचे कार्यालयात दाखल केलेला दिनांक ०१/१०/२०१३ रोजीचा मोजणी अर्ज क्र. १९८८ दाखल केला आहे. **(साक्षीदाराला सदरचा अर्ज दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर वादीची सही आहे. (अर्जास **निशाणी ५४** देण्यात येते.) वादीने मोजणीसाठी उप-अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, संगमनेर येथे फी रक्कम भरली. त्याची पावती दाखल केली आहे. **(साक्षीदाराला निशाणी ४७/३ येथील पावतीची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली.)** हि तीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर मुख्यालय सहाय्यक (ओ.एस.) यांची सही आहे. (त्यास **निशाणी ५५** देण्यात येते.) तसेच, मी मौजे - पारेगाव बु. ता. संगमनेर येथील सिटी सर्वे क्र. ८८ चा मालमत्ता पत्रक उतारा दाखल केला आहे. **(साक्षीदाराला निशाणी ४७/४ येथील मालमत्तापत्रक उतारा दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदरचा उतारा हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास **निशाणी ५६** देण्यात येते.) तसेच, मी सिटी सर्व नं. ८८ चा मुळ अभिलेखाप्रमाणे नकाशा मालपत्ता पत्रकालगत दाखल केलेला आहे. **(साक्षीदाराला निशाणी ४७/५ लगतचा नकाशा दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरचा नकाशा हा निमतानदार, उप-अधिक्षक भुमी अभिलेख कार्यलय, संगमनेर यांनी काढलेला आहे. (सदरचा नकाशा हा सार्वजनिक दस्ताऐवज असल्याने त्यास **निशाणी ५७** देण्यात येते.) तसेच मी मोरनं ७३/२०१३ मधील मोजणी आदेशाची प्रत दाखल केली आहे. **(साक्षीदाराला निशाणी ४७/६ येथील सदर मोजणी आदेश दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर उप-अधिक्षक भुमी अभिलेख संगमनेर यांची सही आहे. (सदरचा आदेश हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने त्यास **निशाणी ५८** देण्यात येते.) मोजणी आदेशानुसार मी वादी व प्रतिवादी यांना पोस्टाने मोजणी नोटीस काढली. सदरची मोजणी नोटीस व पोस्टाच्या पावत्या मी दाखल केलेल्या आहेत. **(साक्षीदाराला निशाणी ४७/७ येथील दिनांक ०४.१०.२०१३ रोजीची हदद कायम मोजणीची नोटीस व**

**निशाणी ४७/८ येथील पोस्टाच्या पावत्या दाखविण्यात आल्या.)** हया त्याच आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मोजणीच्या नोटीसवर उप-अधिक्षक, भुमी अभिलेख, संगमनेर यांची सही आहे. (सदरची मोजणी नोटीस व पावत्या यांना एकत्रित **निशाणी ५९** देण्यात येते.)

**०६.** दिनांक १८/१०/२०१३ रोजी मी सिटी सर्वे नं. ८८ ची प्रत्यक्ष जावुन मोजणी केली. तेथे वादीचा जबाब घेतला. **(साक्षीदाराला निशाणी ४७/९ येथील वादीचा जबाब दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर वादीची सही असुन समक्ष म्हणुन माझी सही आहे. (सदर जबाबास **निशाणी ६०** देण्यात येते.) त्यानंतर लगत कब्जेदार प्रतिवादी क्र. २ सोमनाथ महिपत घारे यांचा देखील जबाब मी नोंदविला. **(साक्षीदाराला निशाणी ४७/१० येथील प्रतिवादी क्र. २ चा जबाब दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर लगत कब्जेदार प्रतिवादी क्र. २ ची सही असुन समक्ष म्हणुन माझी सही आहे. (सदर जबाबास **निशाणी ६१** देण्यात येते.) त्यानंतर मी जागेवर पंचनामा तयार केला. त्यावर पंचाच्या सहया घेतल्या. **(साक्षीदाराला निशाणी ४७/११ येथील दिनांक १८/१०/२०१३ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला.)** हा तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर पंच लोकांच्या सहया असुन समक्ष म्हणुन माझी सही आहे. (सदर पंचनाम्याला **निशाणी ६२** देण्यात येते.)

**०७.** मी मौजे पारेगाव बु., ता. संगमनेर येथील सिटी सर्वे नं. ८८ ची मोजणी करून मोजणी नकाशा तयार केला. त्याच्या अ, ब, क या प्रती तयार केल्या. मी आज न्यायालयात नकाशाची अ प्रत सोबत आणली आहे. नकाशाच्या अ प्रतिप्रमाणे नकाशाची क प्रत खरी व बरोबर असुन ती त्याच्याशी तंतोतंत जुळते. मी मोजणी करून त्याअनुसार सगळी कागदपत्रे न्यायालयात दाखल केलेली आहेत. सदरची मोजणी हि मी फलक यंत्र (plane table) पध्दतीने केली आहे. सदर मोजणी नकाशामध्ये मी निळया रंगामध्ये अतिक्रमण दाखविले आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा उलटतपास प्रतिवादीचे विधीज्ञ ॲड. ए. टी. कासार यांचे तर्फे सुरू</u>** -

०८. नोकरी लागल्यानंतर मला मोजणी संदर्भात प्रशिक्षण दिले गेले. माझे शिक्षण १२ वी, शाखा कला असे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मोजणी हि वादीने आमच्या कार्यालयात केलेल्या अर्जानुसार झाली, ती न्यायालयाच्या आदेशाने झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१३ मध्ये आमच्या कार्यालयात मोजणी अर्जाची प्रक्रिया ही ऑफलाईन होती. मोजणी अर्ज भरण्याची प्रक्रिया ही त्यावेळी ऑनलाईन सुरू होती. कच्च्या अर्जावरून पक्का अर्ज ऑनलाईन भरला जातो. दिनांक ०१/१०/२०१३ रोजीचा अर्ज हा मुख्यालय सहाय्यक यांनी भरला असुन वादीने (अर्जदाराने) भरलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी फी भरून घेवुन त्याची पावती अर्जदाराला दिली जाते व ती रक्कम चलनाद्वारे आमचे कार्यालय बॅंकेमध्ये भरते. सदरची फी रक्कम बॅंकेमध्ये भरलेबाबत माझ्याकडे आज कोणताही कागदोपत्री अभिलेख नाही.

०९. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे होण्यापुर्वी ग्रामपंचायती हद्दीतील मिळकतींचा ग्रामपंचायत कार्यालयात अभिलेख होता. पारेगाव बु., ता. संगमनेर या गावाचा सिटी सर्वे हा सन १९९० साली झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीच्यावेळी मी सिटी सर्वे होण्यापुर्वीचा ग्रामपंचायतीचा अभिलेख सोबत नेला नव्हता. त्याकामी सदरचा अभिलेख मी ग्रामपंचायतीकडुन प्राप्त केला नाही किंवा ग्रामपंचायतीला त्याबाबत नोटीस दिली नाही.

१०. सर्वसामान्यपणे सिटी सर्वे झाल्यानंतर पुर्वीच्या ग्रामपंचायतीच्या अभिलेखाप्रमाणे असलेल्या वहिवाटी, क्षेत्रामध्ये व हद्दीमध्ये थोडेफार बदल झालेले आहेत. पारेगाव बु., ता. संगमनेर या गावामध्ये देखील ग्रामपंचायतीच्या अभिलेखाप्रमाणे असलेल्या वहिवाट क्षेत्रामध्ये व हद्दीमध्ये बदल झाले आहेत

किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिटी सर्वे नं. ८८ ची मोजणी होताना सदर मिळकतीची ग्रामपंचायत अभिलेखामध्ये काय स्थिती होती, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे मॅन्युअल प्रमाणे मोजणी करावयाची असल्यास अर्जदार व लगतदार यांना १४ दिवसपुर्व मोजणी नोटीस दयावी लागते.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, मला दिनांक १०/१०/२०१३ रोजी मोजणी आदेश प्राप्त झाला, त्यानंतर मी लगतदार यांना नोटीस दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी लगतधारकांना १४ दिवस पुर्व नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला लगतधारकांची नावे अर्जदाराने दिली. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करण्यापुर्वी मी लगत कब्जेदार हे अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे आहेत किंवा कसे याची शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, लगत कब्जेदारांना सदर मोजणी नोटीसा मिळाल्यात किंवा कसे, हे मला नक्की सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्यावेळी दर्शविलेले लगतचे कब्जेदार हे तेच आहेत किंवा नाही, याची खात्री मी केली नाही. सदरची खात्री मी वादीच्या अर्जाच्या अनुषंगाने केली. याव्यतिरिक्त मी भुमि अभिलेख पाहिला. मी सिटी सर्वे नं. ८८ चे लगत असलेले सिटी सर्वेचे उतारे पाहिलेले नाहीत. लगतचे कब्जेदाराचे दर्शविलेले मयत मिळकत लगतधारकांचे वारस कोण आहेत, याची मी खात्री केली नाही. मी मोजणीच्यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य किंवा सरपंच यांना बोलविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे चा निमतानदार यांनी बनविलेला नकाशा हा मुळ मोजणी नकाशाप्रमाणे बरोबर आहे किंवा कसे, याची खात्री मी केली नाही. त्यामुळे मी गावचा नकाशा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील पंच हे वादीने बोलविले होते. सर्व पंच हे वादीचे नातेवाईक आहेत किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सिटी सर्वे प्रमाणे कोठेही हददीच्या खुणा त्याप्रमाणे केल्या गेलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, हददीच्या खुणा मला वादीने दाखविल्या. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मला वादीने वहिवाट दाखविली. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी करतेवेळी लगतच्या कब्जेदारांच्या मिळकतीची देखील मोजणी करावी

लागते व ती मी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला हददीच्या खुणा कोठेही आढळुन आल्या नाहीत. मोजणीच्यावेळी अतिक्रमीत क्षेत्रात मला एक गोठा, एक शिवणकामाचे दुकान, एक राहाते घर आढळुन आले किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतेवेळी मोजणी नकाशामध्ये घर, झाडे, विदयुत पोल यांचा उल्लेख करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, मी मोजणी नकाशामध्ये वादीच्या घराव्यतिरिक्त दुसरे काही दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी लगतचे कब्जेदार प्रतिवादी क्र. १ व २ यांना मोजणी नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची मोजणी बेकायदेशीर असुन ती वादीच्या सांगण्यानुसार मी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी नकाशाच्या अ प्रतिनुसार मोजणी नकाशाची क प्रत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी मोजणी केली असुन खोटा मोजणी नकाशा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

संगमनेर
दिनांक :- ०४/०९/२०२५

( के.के.पाटील )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
संगमनेर